# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## पुणे येथे वाहतूक पोलीस शाखेत दंड वसुलीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१) ४४९३४ (२८-१०-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे वाहतूक पोलीस शाखेत दंड वसुलीमध्ये गैरव्यवहार सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नो-पार्किंगमध्ये लावलेल्या गाड्या उचलून त्या सोडविण्यासाठी दंड आकारताना दंडाची रक्कम त्रयस्थ व्यक्तीच्या खात्यावर जमा करुन गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात सह पोलीस आयुक्त यांच्याकडून उक्त प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असताना चौकशीचा अहवाल प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

स्वारगेट व हडपसर येथील वाहतूक विभागात मार्च, २०२२ मध्ये दंड वसुलीमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) स्वारगेट व हडपसर येथील वाहतूक विभागात गैरप्रकार झाल्याबाबत २ अंमलदारांवर कारवाई करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी तत्कालीन अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांनी चौकशी केली असून कसूरदार यांचा अहवाल पोलीस आयुक्त यांना सादर करण्यात आला आहे.

(४) उपरोक्त अहवालानुसार नो पार्किंगमध्ये लावलेल्या गाड्या उचलून त्या सोडविण्यासाठी दंड आकारताना दंडाची रक्कम त्रयस्थ व्यक्तिच्या खात्यावर जमा करून गैरप्रकार केल्याबाबत हडपसर व स्वारगेट वाहतूक विभागातील प्रत्येकी एका अंमलदारांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम २५ व २६ मुंबई पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील तरतूदींच्या अधिन राहून शिक्षा देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील किल्ले राजगड, तोरणा, रोहिडा, रायरेश्वर येथे पर्यटकांसाठी सोयीसुविधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) ४७०६१ (१७-०९-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील किल्ले राजगड, तोरणा, रोहिडा व रायरेश्वर येथे येणा-या पर्यटकांसाठी सोयीसुविधी उपलब्ध करुन देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पर्यटन मंत्री यांना दिनांक २.२.२०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्रानुसार निधीची तरतूद करुन सदरील ठिकाणी पर्यटकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे
(२) किल्ले रोहिडा व किल्ले रायरेश्वर यांना दि.३०/०३/२०१७,१४/१२/२०२२ व २८/०३/२०२२ च्या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
तसेच, किल्ले राजगड व तोरणा यांच्याबाबत पर्यटन संचालनालय यांच्याकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यावर निधी वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालाड पूर्व, महाराष्ट्र नगर येथील शिवप्रेमी संस्थेच्या मालकीच्या भूखंडावर प्रस्तावित आरक्षण रद्द करुन झोपडपट्टी पुनर्विकास योजनेस मान्यता देणेबाबत

**(३) ४९४७८ (२९-०१-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील मालाड पूर्व मधील महाराष्ट्र नगर, आप्पा पाडा येथील शिवप्रेमी सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या मालकीच्या भूखंडावर शासनाने विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ नुसार प्राथमिक व माध्यमिक शाळा करिता आरक्षण प्रस्तावित केल्याने सुमारे ८९७ झोपडीधारक रहिवाशी असलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचे काम गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब दिनांक १०.१०.२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी व सदर गृहनिर्माण संस्थेने विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ नुसार ई.पी.एन.-९३ व ई.पी.पी.एन.-१०५ या भूखंडांवर विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम ३३(१०) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याची मागणी शासनास वारंवार केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संस्थेच्या मालकीच्या भूखंडावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३१(१) अन्वये प्रस्तावित केलेले आरक्षण रद्द करुन उक्त भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (२६-०६-२०२४) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने MRTP अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेनूसार ई.पी खालील जमीन No Development Zone (NDZ) मध्ये समाविष्ट होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेने शासनाच्या मंजूरीने ई.पी.एन-९३ व ई.पी.एन-१०५ खालील जमिनी कलम ३१ (१) अन्वये प्रारुप विकास योजनेस मंजूरी देताना NDZ मधून वगळून अनुक्रमे Special Development Zone (NDZ) मध्ये आणि प्राथमिक व माध्यमिक शाळेचे नामनिर्देशन मंजूर केले आहे.
मालाड (पूर्व) येथील शिवप्रेमी सहकारी गृहनिर्माण संस्था या नावे कोणतीही योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात अद्यापपर्यंत स्वीकृत नाही, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी (परमनंट) सेवेत घेऊन शासनाचे सर्व लाभ देण्याबाबत**

**(४) ५१९८६ (२३-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी (परमनंट) सेवेत घेऊन शासनाचे सर्व लाभ देण्याबाबत चे निवेदन महाराष्ट्र राज्य कंत्राटी कर्मचारी महासंघाने दि. २० ऑक्टोबर २०२२ रोजी मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, व मुख्य सचिव यांना दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन १९९३ पासून शासकीय व निम शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्था मधून विविध आस्थापनेवर हजारो कर्मचारी कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत परंतू त्यांना कोणत्याही मुलभूत सेवा सुविधा मिळत नसल्याने कर्मचाऱ्यामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने राज्यातील विविध आस्थापनेतील विविध रिक्त पदे शासन भरत असताना सन १९९३ पासून सलग सेवा देणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करून उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२४) :** (१) होय.

(२) व (३) कंत्राटी तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यास मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रतिबंधित केले असल्याने या कर्मचाऱ्यांच्या सेवा कायम करणे विधिसंगत ठरत नाही.

राज्य शासनाच्या सेवेतील रिक्त पदे भरताना वित्त विभागाने पदभरतीबाबत वेळोवेळी विहित केलेल्या धोरणानुसार संबंधित विभागांकडून कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतराष्ट्रीय विमानतळ परिसर (सीएसएमआयए) विकास आराखड्याच्या अंतर्गत येणाऱ्या एम.सी.छागला मार्गाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(५) ५३८१३ (२०-०१-२०२३). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतराष्ट्रीय विमानतळ परिसर (सीएसएमआयए) विकास आराखड्याच्या अंतर्गत येणाऱ्या एम.सी.छागला मार्गाची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीची जबाबदारी त्यांची नसल्याबाबत के पूर्व विभाग, महानगरपालिका यांनी बॅनर लावून जाहीर केले असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त परिसरासाठी एमएमआरडीए हे नियोजन प्राधिकरण असल्याने रस्ता दुरूस्तीसाठी प्राधिकरणाने मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा. लि. यांना उपरोक्त परिसरातील एम.सी.छागला मार्गाची दुरूस्ती व देखभाल करणेबाबतचे पत्र दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा. लि. कडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दिनांक ०३.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. यांना छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्राच्या हद्दीमध्ये समाविष्ट होणाऱ्या छागला मार्गाच्या भागाकरीता दुरुस्तीचे व देखभालीचे काम करणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच, मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा. लि. द्वारे केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती सादर करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि.२१.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

## मुंबईतील विलेपार्ले रेल्वे प्रकल्पाबाधित झोपडीधारकांच्या पुनर्वसनाबाबत

**(६) ५३८१५ (२७-०१-२०२३). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील जुहूकर वाडी, विलेपार्ले (पश्चिम) येथील संजय नगर तसेच सांताक्रूझ (पूर्व) येथील ओझा वाडी व आशा नगर येथील काही घरे पश्चिम रेल्वेच्या प्रकल्पात बाधित होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प बाधितांना रेल्वेकडून प्रिमायसेस act अंतर्गत नोटिस बजावण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जी घरे एमयूटीपी प्रकल्पांतर्गत बाधित होतात त्यांचे पुनर्वसन रेल्वे व एमएमआरडीए यांच्या समन्वयातून होत असल्याने यापूर्वी इंदिरा नगर, जोगेश्वरी (पूर्व) येथील रेल्वे प्रकल्प बधितांचे पुनर्वसन अशा प्रकारे करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर परिसरातील प्रकल्प बधितांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०६-२०२४) :** (१), (२), (३) व (४) एमयुटीपी-२बी मुंबई सेंट्रल ते बोरीवली ६ वी अतिरिक्त रेल्वे लाईन प्रकल्पांतर्गत बांद्रा ते बोरीवली Phase-II प्रकल्पाने बाधित नकाशा क्र.१, ओझावडी, प्रभात कॉलनी सातांक्रुझ (पूर्व), नकाशा क्र.२, आशानगर, प्रभात कॉलनी सांताक्रुझ (पूर्व), नकाशा क्र.४ (पूर्व) जेरोमेव्हिला, आझाद रोड, विलेपार्ले, नकाशा क्र.५ श्री. जी. किरण बिल्डींग (भाजीवडी) विलेपार्ले (पूर्व) नकाशा क्र.७, गणेश चाळ, संभाजी नगर, शिवाजी नगर अंधेरी (पूर्व) येथील एकूण ४८ प्रकल्पग्रस्त बाधित असून त्यापैकी २७ प्रकल्पग्रस्तांचे सन २०१७-२०१८ मध्ये कायमस्वरुपी पुनर्वसन गोवंडी-मानखुर्द येथे करण्यात आले असून उर्वरीत २१ प्रकल्पग्रस्तांना मानखुर्द/गोवंडी येथील वसाहतीत करण्यासाठी दि.२२.११.२०१७ व दि.०२.१०.२०२१ रोजी एकतर्फी सदनिका वितरण नोटीस देण्यात आल्या होत्या. परंतु सदर २१ प्रकल्पग्रस्तांची पश्चिम उपनगरात सदनिका वितरण करावयाची मागणी असल्याने त्यांनी अद्याप वितरीत सदनिका स्वीकारलेल्या नाहीत.
नकाशा क्र.७ मधील गणेश चाळ, संभाजीनगर, शिवाजीनगर येथील एकूण १९ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या ताब्यातील विलेपार्ले, अंधेरी(पूर्व) येथील सदनिका उपलब्ध करून देण्याकरीता प्राधिकरणाला कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबाजोगाई (जि.बीड) येथील बसस्थानकात वाहनतळाचे कॉक्रीटीकरण व इतर सोई सुविधेकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत

**(७) ५४२५३ (२५-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील बसस्थानक विस्तारीकरणाचे काम चालू असून वाहनतळाचे कॉक्रीटीकरणाचे काम झाले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थानकात वाटर फिल्टरसह आत्यधुनिक पाणपोई बांधण्याकरिता निधी उपलब्ध करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुंषगाने निधी उपलब्ध करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०६-२०२४) :** (१), (२) होय.

(३) व (४) सद्यस्थितीत अंबाजोगाई बसस्थानकाचे बांधकाम पुर्ण झाले असून बसस्थानकाचा वापर चालू आहे. बसस्थानकामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

अंबाजोगाई येथील बसस्थानकाचे आधुनिकीकरण व वाढविस्तार या कामामध्ये वाहनतळाचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचा समावेश महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या मार्फत प्रस्तावित असलेल्या कामामध्ये करण्यात आला आहे.

---

### खरसई (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील धरणग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(८) ५७२४० (२६-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील ५० वर्षापूर्वी मंजूर झालेल्या खरसई धरणाचे काम १० वर्षापूर्वी पूर्ण झाले असून धरणग्रस्त बहुतांशी शेतक-यांना अद्यापपर्यंत नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरणाच्या परिसरातील ३५ ते ४० शेतक-यांची बागायती व शेतजमीन शेतक-यांना विश्वासात न घेता संपादित करण्यात आली होती, भूसंपादन खात्याने धरणाच्या कामाला सुरूवात केल्यामुळे शेतक-यांच्या विरोधानंतर जमीन व फळबागायत शेतक-यांना शासनाने नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील छोटया मोठया एकूण २८ धरणांच्या यादीमध्ये खरसई धरणाचे नाव नमुद नसल्यामुळे सदर खरसई धरण योजना कोणत्या खात्याकडे वर्ग केली आहे याची माहिती उपलब्ध नसल्यामुळे शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्यास विलंब होत आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून खरसई धरणग्रस्त शेतक-यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०१-०७-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) खरसई योजनेस जलसपंदा विभागाकडून मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर योजना सन १९९४ मध्ये जलसंपदा विभागाकडून जलसंधारण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. सदर योजनेचे काम पूर्ण झाले असून पाणीसाठा करण्यात आला आहे. धरणग्रस्त बहुतांशी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली आहे. सदर प्रकल्पासाठी तीन टप्प्यामध्ये भूसंपादन करण्यात आले आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात रु.४,०५,९३६/-, दुसऱ्या टप्प्यात रु.४,९०,७५९/- व तिसऱ्या टप्प्यात रु.३,५५,७५४/- या प्रमाणे एकूण रु.१२,५२,४४९/- एवढी रक्कम भूसंपादन अधिकारी, रायगड यांचेकडे वर्ग करण्यात आली आहे. त्यापैकी एकूण रु.१०,५६,४६२/- एवढा मोबदला शेतकऱ्यांना महसूल विभागाकडून वाटप करण्यात आला असून उर्वरित रु.१,९५,९८७/- रकमेचा मोबदला वाटपा संदर्भात तसेच फळझाडांच्या मुल्यांकनाबाबत कार्यवाही करण्यासाठी भूसंपादन अधिकारी, रायगड यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरात गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळण्याबाबत

**(९) ५९६९४ (०३-०५-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराच्या जडण-घडणीमध्ये मोलाचे योगदान असणाऱ्या १ लाख ७५ हजार गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळण्यासाठी शासनाकडे सातत्याने मागणी, पाठपुरावा, निवेदने, आंदोलने, मार्चे काढण्यात येवून ही अद्याप ९०% गिरणी कामगारांना घरे उपलब्ध झालेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणी कामगाराची मुंबई शहरामध्ये घरे देण्याची आग्रही मागणी असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, एकूण पात्र गिरणी कामगारांची संख्या किती आहे व या कामगारांना घरे केव्हापर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२४-०६-२०२४) :** (१), (२) व (३) गिरणी कामगारांच्या घरांसाठी आत्तापर्यंत १५,८७० सदनिकांची सोडत काढण्यात आली आहे. अद्याप घरे न मिळालेल्या गिरणी कामगार/त्यांचे वारस यांची पात्रता निश्चित करण्यात आली असून, साधारणतः १ लक्ष गिरणी कामगार पात्र आहेत. गिरणी कामगारांना घरे देण्याच्या अनुषंगाने, दिनांक १५.०३.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, त्यानुसार गिरणी कामगारांना घरे देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर शहरामध्ये प्रदुषणात वाढ झाल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(१०) ६१८१६ (२४-०४-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औष्णीक विघुत केंद्र, उर्जानगर आणि चंद्रपूर परिसरात असलेल्या उद्योगाव्दारे चंद्रपूर शहरात प्रदुषणामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्याने नागरिकाचे आरोग्य धोक्यात आल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रदुषणामूळे चंद्रपूर शहरातील दवाखान्यात नागरिकांना श्वसन, त्वचा, डोळे, ॲलर्जी आणि इतर आजारांचे रुग्ण मोठया संख्येने उपचारासाठी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार चंद्रपूर शहरात मोठया प्रमाणात वाढ होत असलेल्या प्रदुषणाला आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०५-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त दि. १७.०७.२०२३ रोजीच्या अहवालानुसार जिल्ह्यामध्ये नागरिकांना श्वसन, त्वचा, डोळे, ॲलर्जी आणि इतर आजारांचे प्रमाण अत्यल्प असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(३) चंद्रपूर शहरातील व परिसरातील उद्योगांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पाहणी करण्यात येते व पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने उद्योगांवर कार्यवाई करण्यात येते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून चंद्रपूर अतिप्रदूषित क्षेत्रातील (CEPI Area मधील ०४ औद्योगिक वसाहतीतील) सर्व उद्योगांची वेळोवेळी पाहणी करण्यात येते. पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते. मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानूसार चंद्रपूर अतिप्रदूषित क्षेत्रातील १२ मोठ्या उद्योगांना प्रत्येकी रू. १.०० कोटीची पर्यावरणीय नूकसान भरपाई जमा करण्याबाबतचे निर्देश पारीत करण्यात आलेले आहेत.

चंद्रपूर शहरातील प्रदूषण कमी करण्याकरिता National Clean Air Program (NCAP) अंतर्गत चंद्रपूर शहर कृती आराखड्याची अंमलबजाणी चंद्रपूर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागात अद्यापही ४७८ कुटुंबांना शौचालये नसल्याबाबत**

**(११) ६४९०० (२३-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागात अद्यापही ४७८ कुटुंबांना शौचालय नसल्यामुळे केंद्र शासन व राज्य शासनाच्या स्वच्छ भारत मिशनमध्ये अडचणी निर्माण होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील ग्रामीण भागात ९ हजार ८५२ वैयक्तिक शौचालयापैकी ९ हजार ३७८ शौचालये बांधण्यात आली असून अद्यापही ४७८ शौचालये बांधण्याचे काम प्रलंबित असल्याने आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे १०० टक्के जिल्हा हा हगणदारी मुक्त होण्यास दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरहू जिल्हा १०० टक्के हगणदारी मुक्त होण्यासाठी व त्वरीत उक्त कुटुंबांना शौचालये बांधून देण्यासाठी तसेच आरोग्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२१-०६-२०२४) :**(१) व (२) हे खरे नाही.

सदर ४७८ कुटुंबे ही सार्वजनिक शौचालयाचा वापर करणारी होती. तथापि, सद्यस्थितीत सदर ४७८ कुंटुंबानी नव्याने वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज करून त्यानुसार वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पुर्ण केले आहे.

(३) हे खरे नाही,

पायाभूत सर्वेक्षण २०१२ नुसार रायगड जिल्हा दि. १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी हागणदारी मुक्त घोषित झालेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक-मुंबई महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मुंबईतील ईस्टर्न फ्रीवेचा विस्तार भिवंडीपर्यंत करण्याबाबत**

**(१२) ६५१७१ (३०-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक-मुंबई महामार्गावर मोठ्या प्रमाणात होणारी वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी मुंबईतील ईस्टर्न फ्रीवेचा विस्तार भिवंडीपर्यंत करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबईतील ईस्टर्न फ्रीवेचा विस्तार भिवंडीपर्यंत करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे पूर्व मुक्त मार्गाचा विस्तार हा छेडानगर घाटकोपर ते भिवंडीपर्यंत खालील तीन टप्प्यात करण्याचे प्रस्तावित आहे.

१. छेडानगर घाटकोपर ते आनंद नगर, ठाणे

२. आनंद नगर, ठाणे ते साकेत, ठाणे

३. साकेत, ठाणे ते पडघा, भिवंडी

पूर्व मुक्त मार्गाचा छेडानगर, घाटकोपर ते आनंद नगर, ठाणे व आनंद नगर, ठाणे ते साकेत, ठाणे या प्रकल्पांचा सविस्तर प्रकल्प अहवाल सल्लागारांमार्फत तयार करुन त्याचे पुनर्विलोकन करण्यात येत आहे.

तसेच साकेत, ठाणे ते पडघा, भिवंडी या प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी, सल्लागार नियुक्तीसाठी दिनांक १४/०२/२०२४ रोजी निविदा मागविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलजीवन मिशन (जि.रायगड) अंतर्गत मंजुर पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत**

**(१३) ६५६८० (२३-०८-२०२३). श्री.सुनिल शेळके (मावळ), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यासह कोकण व संपूर्ण महाराष्ट्रात जलजीवन मिशन अंतर्गत कामे मंजुर करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रायगड जिल्हयातील पेण येथील खारेपाट विभागात जलजीवन मिशन अंतर्गत शहापाडा व ३८ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.पेण या योजनेस मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांच्या दि.०९/१२/२०२१ च्या आदेशान्वये तांत्रिक मान्यता व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.११/०१/२०२२ चे शासन निर्णयानुसार

रू.२५८८.८० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास मान्यता देवून निविदा प्रक्रियेव्दारे दि.०९/०६/२०२२ अन्वये ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, सदरहू जिल्ह्यात पाणी पुरवठा योजनांचे मंजुरी आदेश, कार्यारंभ आदेशांस एक-एक वर्ष पूर्ण होऊनही ठेकेदारांनी कामे सुरू केली नाहीत तसेच एका-एका ठेकेदाराने ३०-३०, ३५-३५ कामे घेतल्याने शासनाच्या महत्वाकांक्षी जलजीवन मिशनमधील बरीच कामे अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलजीवन मिशन अंतर्गत मंजुर पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी ठेकेदारांना काही कालावधींची अट घालण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने मंजुर योजना पूर्ण करून ग्रामीण भागातील नागरीकांना पाणी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने व उक्त कामाचा दर्जा सुधारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१९-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) रायगड जिल्हयात जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ३१ पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत जिल्हा परिषदेच्या एकूण १४२२ योजना मंजूर आहेत. निविदाधारकांच्या आर्थिक क्षमतेनुसार न्युनतम निविदाधारकांना कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. जिल्हयात मंजूर कामांपैकी ८३ कामे भौतिक व आर्थिकदृष्टया पूर्ण झाली आहेत. उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) होय.
रायगड जिल्हयात जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी योजनांच्या कार्यारंभ आदेशामध्ये योजना पूर्ण करण्याच्या कालावधीची अट घालण्यात आली आहे.
तसेच, जल जीवन मिशन अंतर्गत शहापाडा व ३८ गावे (ता.पेण, जि.रायगड) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक ०९.०६.२०२२ रोजी देण्यात आले असून, योजनेचे काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने इतका देण्यात आला आहे.
(५) रायगड जिल्हयात जल जीवन मिशनअंतर्गत मंजूर कामे गुणवत्तापूर्ण व कामांचा दर्जा टिकवून मुदतीत पूर्ण करण्यासाठी दोन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थांची व योजनांच्या कामांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी दोन संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात सिताफळ पिकाला बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१४) ६६३३१ (१२-०९-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात अंजिरप्रमाणे सिताफळाचे मोठ्या प्रमाणात पिक घेतले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र या सिताफळ पिकाला बाजारपेठ नसल्याने बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने माहिती व निर्णय घेवून येथील सिताफळांना देश व जागतिक पातळीवरील बाजारपेठ मिळवून देण्यासाठी फार्मर प्रोड्यूसर कंपनी स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२६-०६-२०२४) :** (१) कृषि विभागाच्या अंदाजानुसार पुणे जिल्हयात सन २०२२-२३ या वर्षात ४५१९ हेक्टर क्षेत्रावर सिताफळाची लागवड असून सुमारे ४५१८८ मे.टन इतके उत्पादन झाले आहे.
(२), (३) व (४) राज्यात जुलै २०१६ मध्ये फळे व भाजीपाला नियमनमुक्त करण्यात आला. कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे येथे सन २०२२-२३ मध्ये सिताफळ पिकाची आवक ४०,८०० क्विंटल असून त्यास सरासरी रु.५८७८/- प्रति क्विंटल इतका दर मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य कृषि पणन महामंडळामार्फत फळ व धान्य महोत्सव योजना, अंतराज्य शेतमाल व्यापार, रस्ते वाहतूक योजना राबविण्यात येत असून त्यांचा सिताफळ उत्पादक शेतकरी लाभ घेऊ शकतात. त्याचप्रमाणे राज्यातील प्रमुख फलोत्पादन १५ पिकांसाठी उत्पादन ते ग्राहकापर्यंत वितरण अशा एकात्मिक मूल्य साखळयांचा विकास विचारात घेऊन मॅग्नेट प्रकल्पांची आखणी करण्यात आली आहे.

---

## राज्यात अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाच्या धोरणाबाबत

**(१५) ६६८३७ (१२-०९-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाच्या धोरणास राज्य मंत्री मंडळाच्या बैठकीत माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कोणते धोरण निश्चित करण्यात आले आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, राज्यातील एकूण किती मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेचा पुनर्विकास करण्यात येणार आहे व अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) विभागाच्या दि. ३१.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे.
(३) राज्यात सुमारे शहरी भागात ४१४ व ग्रामीण भागात (जिल्हापरिषद परिक्षेत्रात) ३९९ असे एकूण अंदाजे ८१३ मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या भुखंडावर इमारतींचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर इमारतींचे बांधकामासंदर्भातील प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर यावर शासन नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेने चालविण्यास दिलेल्या व्यायाम शाळा खाजगी संस्था अतिरिक्त शुल्क आकारुन चालवित असल्याबाबत

**(१६) ६७२६४ (२४-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या ८९ व्यायाम शाळांपैकी ५३ व्यायाम शाळा या खाजगी संस्था, स्पोर्ट्स, सार्वजनिक मंडळे, इत्यादी संघटनांना महानगरपालिकेमार्फत दरमहा दोन हजार रुपये सेवाशुल्क देऊन चालवण्यास देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका हद्दीतील नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने महानगरपालिकेची इमारत, महानगरपालिकेचे साहित्य आणि महानगरपालिकेतर्फे भत्ता देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ५३ व्यायाम शाळा चालविणाऱ्या खाजगी संस्थांकडून महानगरपालिकेकडून ठरवून दिलेल्या दरमहा दहा रुपये शुल्क घेण्याऐवजी व्यायामशाळा चालक एक ते दीड हजार रुपये दरमहा शुल्क आकारीत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने महानगरपालिकेने चालविण्यास दिलेल्या व्यायाम शाळेत येणाऱ्या नागरिकांकडून निर्धारित शुल्कापेक्षा अतिरिक्त शुल्क वसूल करणाऱ्या संस्थांवर महानगरपालिकेच्या क्रीडा विभागामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) महानगरपालिकेमार्फत व्यायामशाळा वापराबाबत नविन धोरण तयार करण्याची कार्यवाही कार्यान्वित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिका हद्दीत समावेश झालेल्या ग्रामपंचयाती मधील अपात्र कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याबाबत

**(१७) ७१६३२ (०६-०२-२०२४). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका हद्दीत समावेश झालेल्या ग्रामपंचयाती मधील ६०३ अपात्र कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या अपात्र ठरलेल्या ६०३ कर्मचाऱ्यांबाबत फेरविचार करण्याचे आदेश शासनाने निर्गमित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिका, विभागीय आयुक्त, व जिल्हा परिषद अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती या करिता निश्चित केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत या प्रकरणी बोगस ठरविलेल्या अपात्र कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असून ऐन सणासुदीच्या काळात त्यांची नोकरीविणा हेळसांड सुरू असताना शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांनी जा.क्र.पंचायत/आस्था-८/४३८/२०२१, दि.२०/१२/२०२१ अन्वये चौकशी अहवाल आयुक्त, पुणे महानगरपालिका याजकडे सादर केला आहे. सदर अहवालामध्ये ६७२ कर्मचारी नियमबाह्य असल्याचे नमूद आहे. त्यानुसार ६७२ कर्मचारी यांना दि.०३/०२/२०२२ पासून कामावरुन कमी करण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांच्याकडून फेर चौकशीसाठी तीन सदस्य समिती गठीत केली असून सदर समितीचा चौकशी अहवाल प्राप्त होणे बाकी आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईच्या रस्त्यांवर धावणाऱ्या अनफिट टॅक्सीबाबत

**(१८) ७१६९४ (०८-०२-२०२४). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या रस्त्यांवर धावणाऱ्या २६ हजार टॅक्सीपैकी २४५०० टॅक्सीचे फिटनेस झाले असून १५०० टॅक्सीज अनफिट असतानाही मुंबईच्या रस्त्यांवर धावत असल्याचे आरटीओ मुंबई सेंट्रल यांनी केलेल्या पाहणीत निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईकरांच्या जिवाशी खेळणाऱ्या १५०० अनफिट टॅक्सीज मुंबईच्या रस्त्यांवरून हटवण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०४-२०२४) :** (१) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) यांच्या अभिलेखानुसार दिनांक ०१.०४.२०२३ ते दिनांक ३१.०१.२०२४ या कालावधीत २४०४२ इतक्या टॅक्सींचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करण्यात आलेले आहे.

(२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) यांच्या वायुवेग पथकामार्फत रस्त्यावर धावणाऱ्या व योग्यता प्रमाणपत्राची मुदत संपलेल्या टॅक्सीवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| कालावधी | योग्यता प्रमाणपत्र नसलेल्या टॅक्सी चालकांना देण्यात आलेली प्रतीवेदने | निकाली | वसुल करण्यात आलेला दंड (लाखात) |
|---|---|---|---|
| दिनांक ०१.०४.२२ ते दिनांक ३१.०३.२३ | २६१ | १८६ | ९.३० |
| दिनांक ०१.०४.२२ ते दिनांक ३१.०३.२३ | १५८ | १२९ | ६.२० |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३' या मार्गिकेच्या खर्चात झालेली वाढ

**(१९) ७१८३१ (१४-०२-२०२४). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ या मार्गिकेच्या खर्चात एका वर्षात सुमारे ४ हजार कोटींची वाढ झाल्याने, या प्रकल्पाचा खर्च सन २०२२ मध्ये ३३ हजार ४०५ कोटी रुपये असून आता थेट ३७ हजार २७६ कोटी रुपयांवर गेला असल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) सध्या ३३.५ किमी लांबीच्या भुयारी मेट्रो मार्गाचे काम करत असून ही मार्गिका आतापर्यंत पूर्ण होऊन वाहतूक सेवेत दाखल होणे अपेक्षित असतांना तसेच या मार्गिकेच्या मूळ खर्च

२३ हजार १३६ कोटी इतका असतांना १० हजार २७० कोटी रुपयांनी वाढ झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मार्गिकेला विलंब लागण्याची तसेच खर्चात वाढ होण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ या मार्गिकेचे काम सत्वर पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२४) :** (१) व (२) कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ या प्रकल्पासाठी दि.०३ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयानुसार रू. २३,१३६ कोटी इतक्या खर्चास मंजूरी देण्यात आली होती. दि.२५ ऑगस्ट, २०२२ च्या शासन निर्णयानुसार सदर प्रकल्पाच्या सन २०२१ पर्यंतच्या रू.३३,४०५ कोटी सुधारित खर्चास तसेच सन २०२१ ते सन २०२४ या कालावधीत सल्लागाराचे अतिरिक्त शुल्क, पुनर्वसन व पुनर्वसाहतीकरण यावरील अतिरिक्त शुल्क, स्थापत्य प्रणाली कामांतील भाववाढ, कार्यालयीन खर्च, करांवरील खर्च यामुळे सदर प्रकल्पासाठी रू.३८७० कोटी सुधारित खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार राज्य शासनामार्फत केंद्र शासनास दि. ३० ऑगस्ट, २०२२ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला असून, केंद्र शासनाने दि.२६ एप्रिल, २०२३ च्या पत्राव्दारे मेट्रो ३ प्रकल्पाच्या रू.३७२७५ कोटी खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(३) मा. न्यायालय, प्राधिकरणे व लवाद यांच्याकडील प्रलंबित प्रकरणे, कोविड-१९ च्या प्रादुर्भावामध्ये असलेल्या निर्बंधामुळे तसेच आरे डेपोमधील कामांसाठी दिलेल्या स्थगितीमुळे सदर प्रकल्पास विलंब झाला आहे.
(४) सद्यस्थितीत सदर प्रकल्पाचे ८८.४ टक्के काम पूर्ण झाले आहे. माहे मे-२०२४ मध्ये प्रकल्पाचा फेज-१ व माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये प्रकल्पाचा फेज-२ सुरू करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारती विद्यापीठ (ता.हवेली, जि.पुणे) मागील गेट ते पी.आय.सी.टी.कॉलेज पर्यंतच्या हद्दीमध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूस अनधिकृत व्यवसाय सुरू असल्याबाबत**

**(२०) ७१८६० (०६-०२-२०२४). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारती विद्यापीठ (ता.हवेली, जि.पुणे) मागील गेट ते पी.आय.सी.टी. कॉलेज पर्यंतच्या हद्दीमध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूस अनधिकृत व्यवसाय सुरू असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्याच्या दोन्ही बाजूस एक बाजूला पादचाऱ्यांसाठीचे फूटपाथ ते दुसऱ्या बाजूला रस्त्याचा ताबा हा अनधिकृत व्यावसायिकांनी घेतला असून खाद्य पदार्थ, ज्यूस, पान टपरी, चहाची टपरी, गॅरेज, किरकोळ वस्तूंची विक्री, फळांच्या हातगाड्या फूटपाथवर असल्यामुळे वाहतुकीला अडथळा होत असून पादचाऱ्यांना गैरसोईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याकडे महानगरपालिका प्रशासनाच्या अतिक्रमण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे अशा अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या वाढली असून रस्त्याच्या दुतर्फा ७० ते ७५ हातगाड्या दररोज उभ्या असतात यामुळे गर्दीतून वाट काढणे वाहनचालकांना आणि पादचाऱ्यांना कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, अतिक्रमणधारक आणि संबंधित अतिक्रमण विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने हा प्रकार सुरू असून परिसरातील नागरिक वारंवार महानगरपालिका प्रशासनाकडे तक्रारी करत असताना या प्रकरणी संबंधित महानगरपालिका प्रशासन ठोस कार्यवाही करत नसल्याने या अनधिकृत व्यवसायांमध्ये दिवसागणिक वाढ होताना दिसत आहे, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन अनधिकृत बांधकाम निष्काषित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे. सदर ठिकाणी पुणे मनपाकडून अधिकृत फेरीवाला क्षेत्र (झोन) क्र.२०१ हा यापूर्वी निर्माण करण्यात आलेला असून त्यामध्ये एकूण ५७ नोंदणीकृत फेरीवाल्यांचे पुर्नवसन करण्यात आलेले आहे. तसेच त्या परिसरात अनधिकृतपुणे व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांवर तसेच झोनमधील पुर्नवसन झालेल्या परंतु ज्यादा जागेचा वापर करणाऱ्या/अटी, शर्तीचा भंग करणाऱ्या नोंदणीकृत फेरीवाल्यांवर वारंवार कारवाई करण्यात येते.
(२) अंशत: खरे आहे. रस्त्याच्या एका बाजूस पी.आय.सी.टी.सीमा भिंती लगत (त्रिमूर्ती चौक ते भारती विद्यापीठ लगत) अधिकृत फेरीवाला क्षेत्र घोषित आहे. तथापि समोरिल बाजूस फुटपाथ नसून रस्त्यावर होणाऱ्या दुचाकी पार्किंग बाबत पुणे पोलिस वाहतूक विभागाशी समन्वय साधून समस्या दूर करण्यात आली आहे.
(३) खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) सदर ठिकाणचा रस्ता, पदपथांवर अनधिकृत बांधकामे नाहीत. परंतु २ पत्राशेड असून त्याबाबत न्यायालयीन दावे प्रलंबित आहेत. पदपथावरील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येते. तसेच सदर रस्त्याच्या एका बाजूस खाजगी मिळकती मधील अनधिकृत व्यवसायिकांवर देखील मनपा बांधकाम विकास विभागाकडून कारवाई करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाढते शहरीकरण आणि वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प उभारण्याबाबत

**(२१) ७२१८५ (१५-०२-२०२४). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाढते शहरीकरण आणि वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी २९ कि.मी. लांबीचा वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प उभारण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे दिनांक १५ आक्टोबर, २०२३ रोजी प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी सादर केलेल्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, त्यानुसार ठाणे शहरातील वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी महत्वपुर्ण असलेल्या वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प उभारण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे दि.०१.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावास लवकरात लवकर मंजुरी देण्याबाबत राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.
(२), (३) व (४) ठाणे शहरांतर्गत उभारावयाचा वर्तुळाकार मेट्रो लाईन प्रकल्पाच्या मार्गिकेची एकूण लांबी २९ कि.मी. असून त्यापैकी ३ कि.मी. भूमिगत लांबीचा असून २२ स्थानके प्रस्तावित आहेत. तसेच ठाणे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प उभारण्याबाबतचा रु.१२२००.१० कोटीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे. सदरहू प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता प्रलंबित आहे.

---

## महाड (जि.रायगड) तालुक्यातील खाडी पट्ट्यातील गावांना खैरे धरणातून पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईन लिकेज झाल्याने दररोज लाखो लिटर पाणी वाया जात असल्याबाबत

**(२२) ७२२६८ (२९-०२-२०२४). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील खाडी पट्ट्यातील जवळपास २० गावांना खैरे धरणातून पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन लिकेज झाल्याने दररोज लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागामार्फत देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याने पिण्याच्या पाईप लाईन लिकेजमुळे अशुध्द पाणी पुरवठा होत असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच खैरे धरणाच्या निर्मितीपासून बसवलेली पाणी शुध्दीकरण यंत्रणाही नादुरुस्त असल्याने अशुध्द पाण्याचे प्रमाण आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर तालुक्यातील खैरे धरणातून पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईनचे लिकेज व शुध्दीकरण यंत्रणेची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१९-०६-२०२४) :** (१) व (२) खैरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेअंतर्गत खैरे धरणातून २० गावांना पाणी पुरवठा केला जातो. सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सन १९९७ पासून कार्यान्वित करण्यात आली असून, सदर योजनेस २५ वर्षा पेक्षा जास्त कालावधी झाल्याने योजनेत वापरण्यात आलेले लोखंडी पाईप गंजलेले व नादुरुस्ती असल्यामुळे वारंवार लिकेज होत असतात. अशी गळती व नादुरुस्तीची बाब निर्दशनास आल्यास तातडीने पाणी पुरवठा बंद करुन सदर कामे देखभाल दुरुस्ती मधून करुन घेण्यात येतात.

(३) व (४) जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत खैरे गावाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु आहे. सदर योजनेमध्ये जल शुध्दीकरण केंद्राच्या दुरुस्तीचे काम समाविष्ट असून, योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागातील पदे भरण्याबाबत

**(२३) ७२४४४ (०९-०२-२०२४). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.फारूक शाह (धुळे शहर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागातील २८ जिल्ह्यापैकी २३ जिल्ह्यात प्रादेशिक परिवहन अधिकारी पुर्णवेळ उपलब्ध नसल्याने गत ४ वर्षापासून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे तात्पुरता पदभार दिला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरातील आरटीओ मध्ये पूर्णवेळ अधिकारी नसल्याने वाहन चालविण्याचा परवाना आणि वाहन नोंदणीचे प्रमाणपत्र यासारखी नागरिकांची कामे प्रलंबित असून नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रादेशिक परिवहन कार्यालयातील पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०७-२०२४) :** (१) होय.
(२) व (३) सदर कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे या कार्यालयातील प्रादेशिक परिवहन अधिकारी या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आला होता. त्यानुसार सदर कार्यालयातील कार्यालयीन कामकाजाचा निपटारा करण्यात येत होता.

तथापि, राज्यातील प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातील २३ पदांच्या पदोन्नतीस मान्यता देण्यात आली असून त्यामध्ये प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे या पदाचा देखील समावेश आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## पुणे शहरातील जीर्ण जलवाहिन्या बदलून पाणी गळती रोखण्याबाबत

**(२४) ७२४८२ (१७-०२-२०२४). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात समान पाणीपुरवठा योजनेतंर्गत ८० कि.मी.लांबीच्या मुख्य जलवाहिन्यांसह एकूण ४५० कि.मी.लांबीच्या जलवाहिन्या बदलण्यात येणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जलवाहिन्या ४० ते ५० वर्षे जुन्या असून त्यातून सुमारे ४० टक्के पाणीगळती होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन जीर्ण जलवाहिन्या बदलून पाणी गळती रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

समान पाणी पुरवठा प्रकल्पांतर्गत सुमारे १५५० कि.मी. लांबीच्या विविध व्यासाच्या जलवाहिन्या टाकण्याचे नियोजन आहे. यामध्ये जुन्या हद्दीतील सर्वेक्षणानुसार निदर्शनास आलेल्या जुने व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बंद करुन त्या ठिकाणी नवीन जलवाहिन्या टाकण्यात येत आहेत. जुन्या परंतु वापरायोग्य पाण्याच्या लाईन वापरण्यात येणार आहेत.
(२) अंशत: खरे आहे.

पुणे शहरातील वितरण व्यवस्था मधील जलवाहिन्या ३० ते ४० वर्षापूर्वीच्या आहेत व त्यामध्ये सुमारे ३५% ते ४०% पाण्याची गळती होत असून ती गळती कमी करुन २०% पर्यंत आणणे हा प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.
(३) पुणे शहरामधील वितरण व्यवस्था ३० ते ४० वर्षे जुनी आहे. पुणे शहरासाठी समान पाणीपुरवठा प्रकल्प हाती घेण्यात आला असून प्रकल्प मुख्य सभा ठराव क्र.६० दिनांक २२/५/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर प्रकल्पअंतर्गत प्रामुख्याने आवश्यकतेनुसार पाण्याच्या टाक्या बांधणे, भूमिगत पाण्याच्या लाईनची तपासणी करुन आवश्यकतेनुसार जुन्या लाईन बदलणे व हायड्रोलिक डिझाईननुसार नवीन पाण्याच्या लाईन टाकणे, ए.एम.आर. मिटर

बसविणे, पाण्याच्या टाक्यांमध्ये जाणाऱ्या व वितरण लाईनवर इलेक्ट्रॉमॅगनेटिक मीटर बसविणे, प्रेशर सेन्सर बसविणे, स्काडा व ॲटोमेशन करणे, इत्यादी कामे करण्यात येणार आहेत. सदर कालावधीत पाण्याची गळती ३५% ते ४०% कमी करुन ती २०% पर्यंत आणणे हा प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

(४)

१. जागतिक महामारी Covid-१९ च्या लॉकडाऊन कालावधीमध्ये कामगार वर्ग उपलब्ध नसल्याने व जागेवर काम करणेस प्रतिबंध असल्यामुळे काम करण्यास विलंब झाला आहे.

२. पुण्यातील पेठ व मध्यवर्ती शहरी भागात पाईपलाईनचे काम रहदारीच्या अरुंद रस्ते व अस्तित्वातील सेवा वाहिन्यांचे जाळे असल्याने दिवसा करता येत नाही. त्यामुळे ही काम करण्यास विलंब होत आहे.

३. पाण्याचे लेखापरीक्षण करण्यासाठी १००% मिळकतींना पाण्याचे AMR मीटर बसविणे आवश्यक आहेत. तथापि सदर मिटर बसविण्याच्या कामासाठी नागरिकांचा विरोध होत असल्याने सदरच्या कामासाठी विलंब होत आहे.

---

## सिडको हडको क्षेत्र (जि.नांदेड) कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२५) ७२६२२ (१६-०२-२०२४). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको हडको क्षेत्र (जि.नांदेड) कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांच्या गैरव्यवस्थानेमुळे ले-आऊटमधील मोकळा भूखंड गायब झाल्याचा प्रकार तसेच नागरिकांना कुठल्याही मुलभूत सोई-सुविधा मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सिडको हडको क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांच्या गैरकारभाराची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच सिडको हडको येथील नागरिकांना मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सिडको प्राधिकरणाने मंजूर केलेल्या लेआउटमधील सर्व मोकळया जागा सिडको प्राधिकरणाने सन २००५ मध्ये महानगरपालिकेस हस्तांतरीत केल्या आहेत व त्या सर्व जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत.

सदरील भागामध्ये महानगरपालिकेकडून मूलभूत सोई-सुविधा पुरविल्या जातात.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अजनी बु. गाव ते निलंगा-घरणी (ता.शिरुर अंतपाळ, जि. लातूर) या मुख्य रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत

**(२६) ७२७३० (०६-०३-२०२४). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजनी बु.गाव ते निलंगा-घरणी (ता. शिरुर अनंतपाळ, जि.लातूर) या मुख्य रस्त्यात मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असल्याने वाहनधारकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्यांची दुरुस्ती तात्काळ करणेबाबत नागरिकांकडून वारंवार मागणी करण्यात येवूनही प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरील रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ नुसार सदर रस्त्याचे नाव अंकुलगा (स.) - रामा-२४० – अजनी – साकोळ – प्रजिमा-३३ असे असून तो इतर जिल्हा मार्ग क्र.७७ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी ६.७० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याची लांबी डांबरी पृष्ठभागाची असून नादुरुस्त आहे.

सन २०२२-२३ मध्ये सदर रस्त्याचे गट-अ अंतर्गत खड्डे भरण्याचे रु.४.०० लक्षचे काम पूर्ण झाले आहे. तसेच सन २०२३-२४ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रस्त्यावरील पूल दुरुस्तीसाठी रु.१०.०० लक्ष व रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.३०.०० लक्ष इतक्या किंमतीचे काम मंजूर आहे. सदर दोन्ही कामांची निविदा प्रक्रीया पूर्ण झाली असून विहित मुदतीत काम पूर्ण करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील गिरगांव आणि काळबादेवी मेट्रो प्रकल्पाशेजारील असलेल्या जुन्या इमारतींना मोठ्या प्रमाणावर तडे गेल्याबाबत

**(२७) ७२८५९ (११-०२-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गिरगांव आणि काळबादेवी मेट्रो प्रकल्पाशेजारील असलेल्या जुन्या इमारतींना मोठ्या प्रमाणावर तडे गेले असून त्या धोकादायक झाल्याने रहीवाशांना जिवीतहानी होण्याची भिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतींची मेट्रो कॉर्पोरेशनाने दुरुस्ती करुन द्यावी, अशी मागणी येथील रहिवाशी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पाशेजारील इमारतींचे तातडीने सर्वेक्षण करुन या इमारतींची दुरुस्ती करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०६-२०२४) :** (१), (२), (३) व (४) मुंबई मेट्रो लाईन-३ चे काम सुरु करण्यापूर्वी मेट्रो शेजारील इमारतींचे संरचनात्मक सर्वेक्षण करुन अहवालाची प्रत इमारत मालकांना मेट्रोचे काम सुरु करण्यापूर्वी देण्यात आलेले आहे. गिरगांव-काळबादेवी परिसरातील मुंबई मेट्रोच्या बोगद्याचे काम हे अत्याधुनिक टनेल बोरींग मशीन ने माहे डिसेंबर, २०१९ मध्ये पूर्ण झालेले आहे. मेट्रोचे काम चालू असताना सदर परिसरातील इमारतींचे नियमित निरीक्षण करण्यात येते. सदर परिसरातील इमारतीच्या संरचनेवर मेट्रोच्या कामामुळे कोणताही विपरीत परिणाम झालेला दिसून आलेला नाही.

---

## असंघटित कामगारांपैकी बांधकाम मजुर या मोठया वर्गाच्या सर्वांगिण विकासाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

**(२८) ७२९१३ (१२-०३-२०२४). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इमारती, रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक, कालवे, गटारे, बंधारे व पुर नियंत्रण कामे, ऊर्जा वाहतूक नेणे व वितरित करणे, पाण्या संबंधीची विविध कामे, तेल वायुसंबंधाची कामे, पोलादी पूल, दगडखान वीट भट्टीवर काम करणारे कामगार अशा विविध स्तरावर हे काम करत असून त्यांच्या अनेक समस्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामगारांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचा विशेष करून इमारत व बांधकाम कामगारांची नोंदणी वाढवण्यासाठी शासन स्तरावर काय उपाययोजना केल्या जात असून, सन २०२२-२०२३ या वर्षापर्यंत किती कामगारांची नोंदणी झाली आहे,
(३) असल्यास, हा कामगार वर्ग हा धोक्याच्या ठिकाणी काम करत असून सदरहू कामगार वर्गाच्या आरोग्यासाठी कोणकोणत्या योजना राबविल्या जात आहेत, त्याची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उपरोक्त कामगारांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याबाबत तसेच इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी शासन स्तरावर कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०७-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दुष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ लागू केला असून सदर अधिनियमाव्दारे राज्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराच्या निधीमधून मंडळामार्फत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता विविध कल्याणकरी योजना राबविल्या जातात. उक्त मंडळामार्फत राज्यातील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व त्यांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनेतंर्गत लाभाचे वाटप केले जाते. माहे जुलै २०२० पासून बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाची कार्यवाही मंडळाचे संकेतस्थळ www.mahabocw.in येथे ऑनलाईन पध्दतीने केली जाते.

त्याचबरोबर कामगार विभागाच्या दिनांक ०२.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये नोंदणी अधिकारी वाढविण्यात आले आहेत. शासनाच्या दिनांक ०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणाचे शुल्क रु.०५/- वरुन रु.०१/- प्रतिवर्ष इतके करण्यात आलेले आहे. सन २०२२-२३ मध्ये दृक-श्राव्य, दूरचित्र, ध्वनीफीत, होर्डिंग्ज, पथनाट्ये, चित्रफीत, छपाई साहित्य इ. विविध माध्यमांद्वारे मंडळांतर्गत नोंदणी/ नूतनीकरण/लाभ वाटप योजनांची प्रचार प्रसिद्धी करण्यात आलेली आहे.

सन २०२२-२३ या वर्षापर्यंत एकूण ४४,७२,३७० इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे.
(३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत जिवित (सक्रिय) बांधकाम कामगारांकरिता विविध प्रकारच्या शैक्षणिक, आरोग्य विषयक, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक सहाय्य स्वरुपाच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. यापैकी ०७ प्रकारच्या आरोग्य विषयक योजना राबविण्यात येतात. सदर योजना ह्या DBT in Money व DBT in Kind स्वरुपाच्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्ह्यातील जलजीवन मिशनतंर्गतच्या प्रलंबित कामांबाबत

**(२९) ७३३१० (२९-०२-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात जलजीवन मिशनअंतर्गत गेल्या काही वर्षांत मिळालेली कामे कंत्राटदारांनी अद्याप सुरु केली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांची संख्या सुमारे ३० ते ३५ असून या गावांना पुढील वर्षापर्यंत शुध्द पाणी पिण्यास मिळण्याची शक्यता कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर कामे सुरु न करणाऱ्या कंत्राटदारांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२१-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे. जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात सुमारे १३०० योजना मंजुर आहेत. सर्व कामाची निविदा कार्यवाही पुर्ण करुन; माहे जानेवारी, २०२३ मध्ये कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. सदर १३०० योजनांपैकी कंत्राटदारांकडून झालेल्या विलंबामुळे १३ व्र इतर कारणांमुळे १८ अशी एकूण ३१ योजनांची कामे ऑक्टोबर, २०२३ पर्यंत सुरू करण्यात आलेली नव्हती. सदर सर्व ३१ योजनांच्या गावांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असून, त्यामध्ये विहीर, हातपंप व जुन्या नळ योजनांचा समावेश आहे. तसेच त्यापैकी बऱ्याच योजना रिट्रोफिटींग असल्याने, सदर गावात शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे.
(३) व (४) प्रलंबित ३१ योजनांच्या कामांबाबत संबंधित उपविभाग व PMC यांच्याकडून पत्रान्वये संबंधित कंत्राटदारांना कामे सूरू करण्याबाबत ताकीद देण्यात आली होती. तद्नंतर १३ योजनांपैकी ८ कंत्राटदारांवर दंड वसूलीची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यापैकी ३ कंत्राटदारांकडून रू.२७७९२६/- रक्कम दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच ५ कंत्राटदारांना ५ वर्षांकरिता जिल्हा परिषदे अंतर्गत कामे न करण्यास प्रतिबंधित करण्यात आलेले आहे.
उर्वरित १८ योजनांपैकी ०३ योजना रद्द करण्यात आल्या आहेत तसेच ४ योजनांच्या स्त्रोतामध्ये बदल झाल्याने सदर योजना सुधारीत करण्याच्या प्रक्रीयेत आहेत. उर्वरित ११ योजना (ग्रामस्थांचा विरोध, गाव दुसऱ्या योजनेत समाविष्ठ असल्याने, स्त्रोतापर्यंत रस्ता उपलब्ध नसल्याने ई.) विविध कारणास्तव प्रलंबित असून, सद्यस्थितीत प्रगतीपथावर आहेत.

---

## मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अधिसूचीत क्षेत्रातील झोपडीधारकांच्या पुनर्वसन करण्याबाबत

**(३०) ७३४१७ (१५-०२-२०२४). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अधिसूचीत क्षेत्रातील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना सक्षम प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास विमानपतनाच्या जागेवरील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाकरिता सदनिका हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०६-२०२४) :** (१) व (२) बाबत विमानपत्तन प्राधिकरणाच्या जागेमधील ११ प्राधान्य सूची क्षेत्रांतील झोपडीधारकांचे पुनर्वसन प्राधान्याने करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर ११ प्राधान्य सूचीपैकी ५ विभाग आणि प्राधान्य सूची व्यतिरिक्त ५ विभाग अशा एकूण १० विभागांमधून झोपडीधारकांचे अंतिम परिशिष्ट-II पारीत झाले आहे. त्यानुसार प्राधान्य सूचीपैकी ५ विभागातील ९३८ झोपडीधारक आणि प्राधान्य सूची व्यतिरिक्त ५ विभागातील २४१८ झोपडीधारक अशा एकूण १० विभागांमधून ३३५६ झोपडीधारक पात्र ठरले आहेत. सदर पात्र

झोपडीधारकांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया कुर्ला प्रिमियर कंपाऊंड, कुर्ला येथील इमारत क्र. २ व ३ मध्ये चालू असून, ८६५ झोपडीधारकांचे पुनर्वसन या इमारतींमधील रिक्त सदनिकांमध्ये करण्यात आले आहे. कुर्ला प्रिमिअर कंपाऊंड येथील ३० इमारतींपैकी १९ इमारतींच्या दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे. सदर सदनिकांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यावर उर्वरीत पात्र झोपडीधारकांच्या पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३१) ७४०६६ (१७-०२-२०२४). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरातील महानगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या अनेक रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झालेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीकडे स्थानिक प्रशासनाचे अत्यंत दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरीकांसह लोकप्रतिनिधींनी वारंवार महानगरपालिका प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात तातडीने चौकशी करुन उक्त रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह रस्त्याची दुरुस्ती करण्याकरीता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०७-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) परभणी शहर महानगरपालिका हद्दीतील प्रमुख रस्ते जे सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या प्रमुख जिल्हा मार्गाला जोडतात असे दर्जोन्नत झालेल्या एकूण ११ रस्त्यांपैकी ६ रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाने रीतसर हस्तांतरीत करुन घेतले आहेत. सदर रस्त्यांच्याबाबत आवश्यक कामांची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे.

परभणी शहर महानगरपालिका हद्दीतील व मालकीचे प्रमुख ना-दुरुस्त झालेल्या रस्त्यांच्या डागडूजीकरण करण्याकरीता विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये न्यूनतम देकार असणाऱ्या निविदाकाराला महानगरपालिकेच्या दिनांक १०.४.२०२३ च्या पत्रान्वये २४ महिन्यांच्या कालावधीसाठी सदर कामे देण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मुख्य पाईपलाईन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याच्या हद्दीमध्ये टाकल्याबाबत

**(३२) ७४२२८ (२९-०२-२०२४). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलजीवन मिशन योजनेंतर्गत देवडी, उपळी, चिंचाळा, तिगांव, काडीवडगाव, देवगाव (ता.वडवणी, जि.बीड) येथील पाणी पुरवठा योजनेच्या मुख्य पाईपलाईन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याच्या हद्दीमध्ये टाकल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १७-०८-२०२३ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद बीड यांना पत्र

दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य मार्ग बीड म्हाळसजवळा लवुळ, पात्रुड, जिवनापुर, सिरसाळा राज्य मार्ग क्र.५५ या रस्त्याच्या बाजूपट्टी मधून विना परवानगी देवडी (ता.वडवणी, जि.बीड) येथील जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या पाईपलाईन करीता खोदल्यामुळे शासकीय मालमत्तेचे नुकसान झाले असून दंडात्मक कारवाई करण्याबाबत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव (जि.बीड) यांनी दिनांक ३१.०५.२०२३ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद, बीड यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने याबाबत संबंधीत कंत्राटदाराकडून दंडाच्या रक्कमेची वसूली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२५-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, माजलगाव, जि. बीड यांनी त्यांच्या दिनांक ३१.०५.२०२३ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना कळविले आहे.
(३) जलजिवन मिशन कार्यक्रमांतर्गत मौजे देवडी ता.वडवणी, जि. बीड नळ पाणी पुरवठा योजनेची अशुध्द उध्दरण जल वाहिनीची पाईप लाईन राज्य मार्ग क्रमांक ५५ बीड ते सिरसाळा रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागात बाजुपट्टी मधून टाकण्यासाठी चराचे खोदकाम चालू असल्याबाबतची बाब उप विभागीय अभियंता, सार्वजनीक बांधकाम उपविभाग, माजलगाव, जि. बीड यांनी त्यांच्या दि.३१/०५/२०२३ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांचे निदर्शनास आणली. त्यानंतर बाजुपट्टी लगत पाईपलाईन टाकण्यासाठी केलेले खोदकाम वाप्कोस कंपनीचे संबंधित अधिकारी यांनी बंद करुन, खोदकाम केलेल्या चराचे काम बुजविण्यात आले आहे व राज्य मार्ग क्रमांक ५५ च्या समांतर हद्दीच्याबाहेर अशुद्ध उध्दरण जलवाहीनीची पाईपलाइन टाकण्यात आलेली आहे. त्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण (जि.रायगड) येथील ओएनजीसी प्रकल्पातील क्रूड ऑईल गळती होवून प्रदूषण झाल्याबाबत**

**(३३) ७४४५७ (०८-०२-२०२४). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) येथील ओएनजीसी प्रकल्पातील क्रूड ऑईल साठवणीच्या नादुरुस्त व्हॉल्वमुळे मोठ्या प्रमाणात तेल गळती होऊन लाखो लिटर क्रूड ऑईल थेट समुद्रात मिसळल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे जलप्रदुषण होऊन पारवाडी समुद्र किनाऱ्यावरील परिसरात तेलाचे जाड थर निर्माण होवून समुद्राचे पाणी प्रदूषित झाल्याने मासेमारीही धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने समुद्राचे प्रदूषण रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२४) :** (१) हे अशंत: खरे आहे.
(२) हे अशंत: खरे आहे.

(३) सदरील घटनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त मे.ऑइल ॲड नॅचरल गॅस इंडिया लि. ता.उरण, जि. रायगड या उद्योगास दि.११/०९/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच कंपनीच्या आवाराबाहेरील तेल योग्य पद्धतीने जमा करुन त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट करण्याचे आदेश पारीत केले आहेत.

तहसिलदार, उरण यांच्यामार्फ़त करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान तेल गळतीमुळे नजीकच्या शेतीचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुषंगाने बाधीत शेतक-यांना मे.ऑइल ॲड नॅचरल गॅस इंडिया लि. यांनी तहसिलदार, उरण यांचेमार्फ़त रु.१३,४५,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

सहायक आयुक्त मत्स्य व्यवसाय, रायगड, अलिबाग यांच्यामार्फ़त दि.२६/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मे.ऑइल ॲड नॅचरल गॅस इंडिया लि. यांना मत्स्य संपदेची हानी झाल्याने नुकसान भरपाई देणेविषयी योग्य ती कार्यवाही करण्याचे तसेच यापुढे असे प्रकार टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे महानगरपालिका हद्दीतील वाघोली येथील ड्रेनेज समस्येबाबत

**(३४) ७४९३८ (१६-०२-२०२४). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरानजिक असणाऱ्या वाघोली येथील पुणे अहमदनगर रस्त्यावरील वाघोली येथे मोठया प्रमाणात रहिवाशी सोसायटया असून येथे ड्रेनेजची व्यवस्था नसल्याने नागरिकांमध्ये प्रचंढ असंतोष निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बायफरोडवरील सवाना, आरएमसी, कोलतेपाटील, कोणार्क, सोलेशिया, गुलमोहर या सोसायटीच्या व लगतच्या सोसायटीच्या नागरिकांना डीपी रोड लगत ड्रेनेज लाईन करण्याबाबत पुणे महानगरपालिकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरिकांचे आरोग्य लक्षात घेता सदरची ड्रेनेज लाईनचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) मौजे वाघोली हे गाव माहे जून २०२१ मध्ये पुणे मनपा हद्दीत समाविष्ट झाले आहे, सदर गावामध्ये समावेश होणे पूर्वी असलेली मलनि:सारण व्यवस्था ही वाढलेल्या नागरी वस्तीच्या अनुषंगाने अपुरी असल्याने दैनंदिन देखभाल दुरूस्ती करावी लागते ही वस्तु स्थिती आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) होय, खरे आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांसाठी मलनि:स्सारण डीपीआर तयार करण्यात आलेला असून त्याचे एकूण अंदाजे प्रकल्पीय तरतूद र.रु.१४१७.९७ कोटी इतकी झालेली आहे. सदरच्या नवीन २३ गावांपैकी मौजे वाघोली या गावासाठी र.रू.३७६.६३ कोटी इतकी प्रकल्पीय तरतूद आवश्यक आहे व त्या बाबत तांत्रिक व वित्तीय तरतूद करणे बाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून सुरू आहे. बायफ रोड पासून ते नाल्यापर्यंत अंदाजित २ किलोमीटर मलनि:सारण लाईन टाकणे आवश्यक असून त्यासाठी सन २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रामध्ये रु. ५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पिंपरी चिंचवड (जि.पुणे) नवनगर विकास प्राधिकरणाने भू संपादित केलेल्या जमिनीच्या मूळ मालकांना १२.५% परतावा मिळण्याबाबत

**(३५) ७४९५१ (१७-०२-२०२४). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सन १९७२ मध्ये जमीन ताब्यात घेऊन औद्योगिक क्षेत्रातील नागरिकांना स्वस्त दरात घरकुल उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण (PCNDTA) स्थापन करण्यात आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरात सन १९७२ मध्ये पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची (PCNDTA) स्थापना झाल्यांनतर शहरातील निगडी, आकुर्डी, वाल्हेकरवाडी या गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनी प्राधिकरणाने भूसंपादित केल्या व मूळ मालकांना भूमिहीन बनवून गुंठ्याने जमिनी विक्री केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील पन्नास वर्षांपासून एकीकडे जमीन ताब्यात घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या १२.५ टक्के प्रमाणे मोबदला न देता भूखंड लीज होल्ड फ्री करणे प्रश्न प्रलंबित असताना दुसरीकडे पीएमआरडीएच्या माध्यमातून भूखंडाची विक्री लिलावाने करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच जमीन धारक भूमिहीन न होण्यासाठी सन १९८४ व १९९३ नंतरच्या भूसंपादन बाधितांसाठी १२.५ टक्के क्षेत्र परताव्याचे सुधारित आदेश काढून त्याची अंमलबजावणी अद्यापही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सन १९७२ ते १९८४ मधील जमीन धारकांसाठीही सिडकोप्रमाणे सर्व बाधित जमीन धारकांना १२.५ टक्के दराने परतावा देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जून, २०२३ रोजी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने भूसंपादित केलेल्या जमिनीच्या मूळ मालकांना १२.५% परतावा मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

हवेली तालुक्यातील मौजे मोशी, भोसरी, चिखली, निगडी, आकुर्डी, रावेत, रहाटणी, चिंचवड तसेच मुळशी तालुक्यातील थेरगाव व वाकड या गावातील जमिनी संपादन करण्यात आल्या आहेत. शासनाने मंजुर केलेल्या विकास योजना १९९५ मध्ये विविध प्रयोजनासाठी म्हणजे निवासी, वाणिज्य, औद्योगिक, शैक्षणीक, वैद्यकीय इ. कारणासाठी भूखंड आरक्षीत करण्यात आले व मंजुर लेआऊट नुसार भूखंडांचे वाटप करण्यात आले. तसेच ३४ गृहयोजना राबविण्यात आलेल्या आहेत. तथापी, गुंठयाने जमिनी विक्री केलेल्या नाहीत.
(३) व (४) हे खरे नाही.

दि.०१ जानेवारी, १९८४ पासून तत्कालीन प्राधिकरणासाठी संपादन केलेल्या क्षेत्रासाठी दि. ३ मार्च, १९९० व दि.१५ सप्टेंबर, १९९३ च्या शासन निर्णयानुसार १२.५% परतावा वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार एकूण ५६६ लाभार्थींच्या एकूण १३४.९४ हे.आर देय क्षेत्रापैकी ३५८ लाभार्थींना १०९.९१ हे.आर इतके क्षेत्र परतावा म्हणून दिले आहे. तर अद्याप २०५ लाभार्थींना २४.६० हे.आर इतके परतावा क्षेत्र देण्याचे बाकी आहे. सदर २०५ लाभार्थींना अद्यापर्यंत १२.५% परतावा वाटप न करण्याची कारणे खालीलप्रमाणे -
अ) १८ लाभार्थी(देय क्षेत्र ६ हे.६३ आर.) यांनी संपादित जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे त्यांना परतावा देय नाही.
आ) १४८ लाभार्थी प्रकरणी विविध न्यायालयामध्ये दावे असल्याने त्यांना परतावा अद्याप देता आलेला नाही.
इ) ३९ लाभार्थींच्या वारसांमध्ये / आपापसात वाद असल्याने अथवा कागदपत्रे अपूर्ण असल्याने त्यांना परतावा अद्याप देता आलेला नाही.

शासनाच्या दि.१४ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये सन १९७२ ते १९८३ या कालावधीत संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्यात संबंधित शेतक-यांना ६.२५% जमीन परतावा व सदर भूखंडाकरिता अनुज्ञेय असलेला २.०० चटई क्षेत्र निर्देशांक विनामूल्य मंजूर करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
(५) व (६) होय, हे खरे आहे.

तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९७२ ते सन १९८३ या कालावधीत संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्यात संबंधित शेतक-यांना ६.२५% जमीन परतावा व संदर भूखंडाकरिता अनुज्ञेय असलेला २.०० चटई क्षेत्र निर्देशांक विनामूल्य मंजूर करण्यास दि.१४ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

---

## मुरबाड व शहापूर (जि. ठाणे) या तालुक्यांचा एमएमआरडीए क्षेत्रात समावेश होण्याबाबत

**(३६) ७५०६१ (१०-०२-२०२४). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड व शहापूर (जि. ठाणे) या तालुक्यांचा एमएमआरडीए क्षेत्रात समावेश होण्याकरिता जिल्हाधिकारी ठाणे व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांना दिनांक १२/७/२२ व दिनांक ११/१०/२०२३ व दिनांक १०/०५/२०२३ रोजी या दोन तालुक्यांचा एमएमआरडीए क्षेत्रात समावेश केल्यास तेथील लोकसंख्येस मिळणाऱ्या सुविधांमध्ये फरक पडेल किंवा नाही याबाबतचा अहवाल मागितला असता अद्याप हा अहवाल जिल्हाधिकारी ठाणे , मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषद ठाणे यांनी दिला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त अहवाल मागविण्याबाबत व दोन तालुक्यांचा एमएमआरडीए क्षेत्रात समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मुरबाड व शहापूर (जि.ठाणे) या तालुक्यांचा एमएमआरडीए क्षेत्रात समावेश करण्याकरिता जिल्हाधिकारी, ठाणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांना स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कळविले आहे. सदर अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

---

## पुणे शहरातील मेट्रो स्थानकांवरील असुविधांबाबत

**(३७) ७५३०४ (१६-०२-२०२४). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील नव्याने सुरू करण्यात आलेल्या मेट्रोच्या स्थानकांत नागरिकांना अनेक असुविधा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील मेट्रोच्या स्थानकात शौचालये कमी आणि अस्वच्छतेने ग्रासलेली तसेच वाहन पार्किंग व्यवस्थाही नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मेट्रो स्थानकापासून ऑटो स्टॅन्ड आणि बस स्टॉप ही सरासरीच्या अंतरावर नसल्याने रात्रीच्या वेळी प्रवाशांची गैरसोय होत आहे हे हि खरे आहे काय,

(४) मेट्रो स्थानकावर प्रवाशांकरिता मदत कक्षासह, सुरक्षा रक्षक व्यवस्थाही व्यवस्थित नसल्याने प्रवाशी सुरक्षित नाहीत हे हि खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून मेट्रो संदर्भातील सुविधांबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

पुणे मेट्रो स्थानकांवरील शौचालये वेळोवेळी स्वच्छ करण्यात येत असून दररोज हाऊस किपींग साठी ४ माणसे स्थानकावर उपलब्ध करण्यात आली आहेत.

पुणे मेट्रोची स्थानके ही मुख्यतः मुख्यरस्त्यालगत असून, बाजुने खाजगी मिळकती आहेत. ज्या स्थानकांमध्ये वाढीव जागा उपलब्ध झाली आहे, त्या ठिकाणी पार्किंगची सोय करण्यात आली आहे. तसेच महापालिकांच्या पार्किंगच्या जागा सुद्धा मेट्रो प्रवाशांना उपलब्ध करण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

सर्व मेट्रो स्थानकांच्या खाली रिक्षा स्टॅंड, बस थांबा यांसाठी नियोजन करण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही.

प्रत्येक मेट्रो स्थानकावर ३-४ सुरक्षा रक्षक, मदत कक्ष अशा सुविधा उपलब्ध आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचांदूर (जि.चंद्रपूर) येथे अवैधरित्या कोळसा तस्करी होत असल्याबाबत

**(३८) ७५३३६ (०८-०२-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदूर (जि.चंद्रपूर) येथील भोयगाव मार्गावरील बाबा भंगार नामक डेपोमध्ये बल्लापूर क्षेत्रातील राजूरा, सारती कोळसा खाणीतून कोळसा अवैधरित्या येत असून येथून मोठया प्रमाणात कोळशाची तस्करी होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोळसा तस्करी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) केंद्र शासनाचा उपक्रम असलेल्या मे.वेस्टर्न कोल फिल्डस लि. यांच्या बल्लारपूर अंतर्गत असलेल्या सास्ती ओपन कास्ट खाणीमधून चंद्रपूर महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्र, ऊर्जानगर येथे वीज निर्मितीकरिता कोळसा या खनिजाची वाहतूक ही बल्लारपूर रेल साईडिंग वरुन केली जात असून, या रेल साईडिंग येथे जाण्यासाठी सास्ती-राजुरा या मार्गाचा वापर केला जातो. या खाणक्षेत्रातून भोयगाव मार्गे खनिजाची वाहतूक होत नाही.

---

## कराड – चिपळूण रेल्वे मार्ग प्रलंबित असल्याबाबत

**(३९) ७५८४० (०९-०२-२०२४). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा कराड-चिपळूण रेल्वे प्रकल्पाच्या प्रलंबित असलेल्या कामाबाबत दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी लक्षवेधी चर्चेच्यावेळी बंदरे व खनिकर्म मंत्री यांनी कराड – चिपळूण रेल्वेमार्गासाठी पुन्हा एकदा हा प्रश्नाचा केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल आणि या प्रकल्पासंदर्भात महिन्याभरात बैठक घेण्यात येईल असे सभागृहास आश्वासित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे या प्रकल्पाकरिता कोणत्या प्रकारे पाठपुरावा करण्यात आला आहे,

(३) असल्यास, बंदरे व खनिकर्म मंत्री यांच्याकडून अद्याप कोणत्याही बैठकीचे नियोजन न करण्यात आल्यामुळे संबंधित लोकप्रतिनिधीच्या प्रश्नाकडे शासन दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कराड-चिपळूण रेल्वे महामार्ग प्रकल्पाबद्दल बैठक घेणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०७-२०२४) :** (१) होय.
(२), (३) व (४) कराड-चिपळूण या रेल्वेमार्गासंदर्भात सर्व संबंधितांची बैठक नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ऐरोली कल्याण या रेल्वेच्या मार्गावरील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(४०) ७६६०६ (०९-०२-२०२४). श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऐरोली कल्याण या रेल्वेच्या महत्वाकांक्षी योजनेला सन २०१६ मध्ये मंजूरी देण्यात आली असून रेल्वेने सन २०१८ मध्ये या मार्गावरील १०८० प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत रेल्वेने एमएमआरडीएला सुचना केल्या असून अदयाप त्यांचे पुनर्वर्सन केले नसल्याने प्रकल्पाची मोठया प्रमाणात किंमत वाढणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांनी बाळकुम आणि मानखुर्द येथे जाण्यास नकार देऊन कळव्यातच पुनवर्सन करण्यात यावे अशी मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकल्पामधील महात्मा फुले नगर, सावित्रीबाई फुले नगर व ईश्वर नगर, दिघा येथील २०९ प्रकल्पग्रस्तांनी बाळकुम, ठाणे येथे पुनर्वसन स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे.
(३) ऐरोली-कळवा येथील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्याकरीता १०६७ सदनिका आवश्यक असून भोलानगर व शिवाजी नगर येथील प्रकल्पबाधितांनी त्याच परिसरात पुनर्वसन करण्याची मागणी केली आहे. भोलानगर व शिवाजीनगर येथील ८५८ प्रकल्पग्रस्तांचा पायाभूत सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड येथील तरोडा-चैतन्यनगर रस्ताची दुरुस्ती करण्याबाबत

**(४१) ७६८२५ (१५-०२-२०२४). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथील तरोडा-चैतन्यनगर रस्ता दुरुस्तीचे काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याने येथील वयोवृध्द, शाळकरी मुले व इतर प्रवासी यांना गैरसोईला सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या रस्त्याच्या दुरुस्ती कामाला गती देऊन ते तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत नांदेड रस्ते विकास प्रकल्पास शासन निर्णय दिनांक १.३.२०२३ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यामध्ये शहरातील विविध भागातील एकूण १८२ कामांचा समावेश आहे.
त्यानुसार विहित पद्धतीने निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदरील प्रस्तावातील कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक २३.६.२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदरील रस्ते विकास प्रकल्पांचा काम करण्याचा कालावधी १२ महिने आहे.

सदर प्रस्तावात तरोडा-चैतन्यनगर रस्त्याचा समावेश करण्यात आलेला असून सद्यस्थितीत रस्त्याचे काम ९०% पूर्ण झाले असून उर्वरित काम मुदतीत पूर्ण करुन घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी क्रीडा संकुलासाठी जागा हस्तांतरीत करण्याबाबत**

**(४२) ७७०६२ (२९-०२-२०२४). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी क्रीडा संकुलासाठी जागा हस्तांतरीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.क्रीडा मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने जागा हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२२-०६-२०२४) :** (१) होय,
(२) मा. आमदार तथा अध्यक्ष, तालुका क्रीडा संकुल यांच्या अध्यक्षतेखालील संकुल समितीच्या दि.०६.१०.२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी, कोल्हापूर यांनी दि.१९.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना मौजे कसबा वडगाव येथील भूमापन क्र. २४२/३ मधील १० एकर जागा तालुका क्रीडा संकुल समितीस हस्तांतरीत करण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे दि.२४.१२.२०२३ रोजीच्या पत्रानुसार सदर जागा हस्तांतरीत करण्यासाठी आवश्यक असलेले नाहरकत दाखले/तांत्रिक शिफारस/अभिप्राय ठराव तसेच मोजणी नकाशे संबंधित विभागाकडून मिळण्यासाठीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मित्र नगर (जि.लातूर) येथील परिसरात शिवाई नावाच्या इमारतीला लागलेल्या आगीबाबत**

**(४३) ७७२७४ (१७-०२-२०२४). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपुरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मित्र नगर (जि.लातूर) येथील परिसरात छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उड्डाणपूलाजवळील मुख्य रस्त्यावर शिवाई नावाच्या इमारतीला आग लागली असून त्यामध्ये लोंढे कुटुंबातील तीन जणांना मृत्यु झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील घटना होण्यामागील कारणे काय आहेत तसेच इमारत बांधतांना सर्व प्रकारच्या परवानग्या घेण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कुटुबियांना आर्थिक मदत करुन अशा घटना घडू नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

सदर इमारतीला LMC/TP/८/५९/ २०१५-१६, दि.३०.७.२०१५ अन्वये बेसमेंट फ्लोअर पार्किंग व तळमजला अशी एकूण ३१.६५ चौ.मी.ची बांधकाम परवानगी देण्यात आली होती. परंतु, प्रत्यक्ष जागेवर बांधकाम परवानगीपेक्षा जास्तीचे तळमजला, पहिला, दुसरा मजला व तिसरा मजल्यापर्यंत बांधकाम केलेले आढळून आले.

याशिवाय कुठलेही सामासीक अंतर न सोडता बेसमेंट फ्लोअरला पार्किंग न सोडता दुकाने बांधण्यात आली होती.

सदर इमारतीस कुठल्याही जोत्याचे प्रमाणपत्र, भोगवटा व पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

महानगरपालिकेकडून सदर इमारतीस वारंवार नोटिस देण्यात आलेल्या असून, लेखी नोटिस क्र.जा.क्र.लाशमनपा/३३४/२०२१-२२, दिनांक १६.७.२०२१ अन्वये कळविलेले होते.

(३) महसूल व वन विभाग, दिनांक २७.३.२०२३ च्या शासन निर्णयानुसार प्रति व्यक्ती रु.४.०० लक्ष सानुग्रह अनुदान मृत व्यक्तींच्या वारसांना देण्याबाबतचा अहवाल तहसिलदार, लातूर यांनी दिनांक ४.३.२०२४ रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांना सादर केला आहे.

शासकीय अनुग्रह अनुदान वितरीत करण्यासाठी संबंधितांचे वारसांची माहिती खाते व बँक तपशिलासह मंडळ अधिकारी, लातूर व तलाठी सज्जा-२, लातूर यांना दिनांक २०.३.२०२४ रोजी कळविण्यात आले आहेत.

तथापि, संबंधित वारसाने कोर्टाचे वारस प्रमाणपत्र व तत्सम आवश्यक माहिती सादर न केल्याने अद्याप सानुग्रह अनुदान वितरित होऊ शकले नाही.

या व्यतिरिक्त सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली आहे. समितीने जिल्हाधिकारी यांना घटनेबाबत सुरक्षितता आणि उपाययोजना व भविष्यात अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी अहवाल सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील झीरो माईल याठिकाणी झीरो माईल टॉवर उभारण्याबाबत

**(४४) ७७५८६ (११-०२-२०२४). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील शुन्य माईल म्हणजे नागपूर शहरातील झीरो माईल या ठिकाणी झीरो माईल टॉवर उभारण्याबाबत सन २०१७ मध्ये महामेट्रोला मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वास्तुविशारदांनी आराखडा तयार करुन महामेट्रोला सन २०२१ मध्ये २० मजली झीरो माईल टॉवर बांधकामासाठी निविदा काढूनसुध्दा बांधकाम सुरु झाले नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२४) :** (१) नागपूरातील झीरो माईल या ठिकाणी टॉवर उभारण्यासाठी महामेट्रोला मान्यता मिळालेली नाही. तथापि, शुन्य माईल लगतच्या महामेट्रोच्या जमिनीवर २० मजली मेट्रो स्टेशनच्या संकल्पना योजनेला (Concept Plan) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. ने मान्यता दिली आहे.

(२), (३) व (४) महामेट्रोमार्फत झीरो माईल हे मेट्रो स्टेशनचे बांधकाम पूर्ण झाले असून, स्टेशन कार्यान्वित सुध्दा झाले आहे. मात्र त्यावरील मजल्यांचे बांधकाम हे सार्वजनिक खाजगी सहभाग या तत्वावर करण्याचे ठरले होते. त्यानुसार महोमेट्रोतर्फे २०२१ पासून तीनवेळा निविदा काढण्यात आली व वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. तथापि, करोना काळात बांधकाम क्षेत्रात आलेल्या मंदीमुळे महोमेट्रोने काढलेल्या निविदांना प्रतिसाद मिळालेला नाही. महामेट्रोमार्फत हा प्रकल्प सार्वजनिक खाजगी सहभाग या तत्वावर कार्यान्वित व्हावा याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत.

---

## परभणी शहरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत

**(४५) ७७६८४ (१५-०२-२०२४). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील महानगरपालिकेच्या हद्दीतील सात रस्ते गत दीड वर्षापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आल्यानंतर या रस्त्याच्या कामांचे उद्घाटन तत्कालीन सार्व.बांधकाम मंत्री यांच्या हस्ते झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांची दुरुस्ती झालेली नसल्यामुळे स्थानिक नागरीकांसह प्रवाश्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मा.मुख्यमंत्री माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये परभणी दौ-यावर असतांना पोलिस मुख्यालय मैदानावर येणार असल्याने प्रशासनाने एका रात्रीतून कोणतीही निविदा, प्रशासकीय मान्यता न घेता जेल कॉर्नर ते पोलीस मुख्यालय प्रवेशव्दारापर्यंतच्या रस्त्याची डागडूजी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच परभणी शहरातील उक्त रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) परभणी शहर महानगरपालिका हद्दीतील व मालकीचे प्रमुख ना-दुरुस्त झालेल्या रस्त्यांच्या डागडूजीकरण करण्याकरीता विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये न्यूनतम देकार असणाऱ्या निविदाकाराला महानगरपालिकेच्या दिनांक १०.४.२०२३ च्या पत्रान्वये २४ महिन्यांच्या कालावधीसाठी सदर कामे देण्यात आली. यामध्ये अत्यावश्यक प्रकारची कामे याच कंत्राटदाराकडून करण्याबाबत प्रावधान उपलब्ध आहे. याचा अवलंब करुन मा.मुख्यमंत्री महोदय परभणी दौऱ्यावर असतांना पोलिस मुख्यालय मैदानावर येणार असल्याने जेल कॉर्नर ते पोलीस मुख्यालय प्रवेशद्वारापर्यंतच्या रस्त्याची डागडुजी याच कंत्राटदारामार्फत करण्यात आली.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई येथील बाळासाहेब ठाकरे रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत

**(४६) ७७९५४ (१७-०२-२०२४). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पश्चिम) येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित केलेल्या बाळासाहेब ठाकरे रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम पश्चिम द्रुतगती महामार्गापासून वीरा देसाई मार्ग पर्यंत अदयाप अपूर्ण असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाचे पश्चिम द्रुतगती महामार्गापासून वीरा देसाई मार्ग या टप्प्याचे अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त झालेली अंदाजे रु.३८५ कोटी ची रक्कम इतर अन्य ठिकाणी/अन्य कारणासाठी वापरण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाचे पश्चिम द्रुतगती महामार्गापासून वीरा देसाई मार्ग पर्यंतच्या टप्प्याचे अपूर्ण असलेले बांधकाम पूर्ण करण्यासाठी अंदाजपत्रकानुसार किती रक्कमेची व कालावधीची आवश्यकता असून सदरहू कामाचे कंत्राट कोणास देण्यात आले आहे,

(४) असल्यास, पश्चिम द्रुतगती महामार्गापासून वीरा देसाई मार्ग पर्यंत सदर पुलाचे अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्याकरिता काही तबेले, दुकाने आणि अनधिकृत बांधकामे निष्कासहित करण्याच्या कामामध्ये दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांधकाम करण्यात येत असलेल्या लिंक रोड पासून पूनम नगर पर्यंतच्या ५.०७ किमी लांबीच्या पुलाच्या बांधकामास किती रक्कमेची आवश्यकता असून सदरहू प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार सदरहू पुलांची बांधकामे पूर्ण करण्याकरीता लागणाऱ्या खर्चाची पूर्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेने न्यू लिंक रोड ते पूनम नगर, महाकाली पर्यंत उड्डाणपूल प्रस्तावित केला होता. त्यापैकी महानगरपालिकेने स्वामी विवेकानंद रोड ते पश्चित द्रुतगती महामार्ग पर्यंत उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण केले असून, सदर उड्डाणपुल वाहतुकीसाठी खुला केला आहे. ज्याला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल असे नाव देण्यात आले आहे.

उर्वरीत उड्डाणपुलाच्या कामामध्ये मेट्रो आणि उड्डाणपुलाचा ओव्हरलॅपिंग भाग असे एक काम आहे व उड्डाणपुलाचा ओव्हरलॅपिंग भाग व अस्तित्वात असलेला उड्डाणपुल याला जोडणारे मिसिंग लिंक्स असे एक काम आहे. या संपूर्ण ५.०७ किमी लांबीच्या पुलाच्या बांधकामास रू.७६८.८५ कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे.

त्यापैकी मेट्रो आणि उड्डाणपुलाचा ओव्हरलॅपिंग भाग या एका कामाचे बांधकाम दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फत करण्यात येत असून, सद्यस्थितीत सदरचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून, महानगरपालिकेकडून वर्ग करण्यात आलेल्या रू.३७८.७० कोटी निधीचा वापर सदरच्या स्थापत्य कामासाठी करण्यात येत आहे.

तसेच मिसिंग लिंकचे काम मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांना देण्यात आले असून, सदर बांधकाम मे, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. सदर कामासाठी रु.३७८.७० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर भागात डी.पी. रस्त्यातील बांधकामे बृहन्मुंबई महानगरपालिका व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे निष्कासित करण्यात येत असून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत समन्वय साधण्यात येत आहे. सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे.
(६) सदर उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी रू.७६८.८५ कोटी खर्च अपेक्षित असून, सदर खर्चाची पूर्तता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.

---

## तारापूर-बोईसर ( जि. पालघर ) औद्योगिक वसाहतीलगत असलेली बेकायदा गोदामे हटविण्याबाबत

**(४७) ७७९८० (०८-०२-२०२४). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर-बोईसर (जि. पालघर) औद्योगिक वसाहतीलगत सरावली, अवधनगर, मान, वारांगडे, गुंदले आदी भागात रहिवासी वस्तीमध्ये मोठ्या प्रमाणात भंगार व्यावसायिक आणि विक्रेते यांच्या बेकायदा गोदामात वाढ झालेली असून त्यांनी महसूल विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची कोणतीही परवानगी न घेता सदरहू गोदामामध्ये तारापूर औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यातून बाहेर निघणारे भंगार साहित्य आणि घातक रसायनांची पिंपे यांची बेकायदेशीर साठवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी भंगार साहित्याची साठवणूक केल्यामुळे आग लागण्याच्या घटना घडून मोठी दुर्घटना होऊ शकते तसेच गोदामातील प्रदुषणामुळे ग्रामस्थांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याबाबत ग्रामपंचायत, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हाधिकारी, पालघर तसेच तहसीलदार, पालघर आदींकडे सातत्याने ग्रामस्थांनी तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह बेकायदा गोदाम हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून गोदामांना संमतीपत्र देण्यात येत नाही. तथापी उद्योगामधून निर्माण होणाऱ्या प्लास्टिक, पुठ्ठयाचे बॉक्स, पेपर, लाकूड या स्वरूपाचा भंगार व रसायनयुक्त अथवा रसायन विरहीत (रिकामे) पिंपे घेवून ते धुणे व डागडुजी करून त्याचा पुर्न: वापर करणेकरीता अटी शर्तीसह संमतीपत्र देण्यात आले आहेत.
(२) अवैध गोदामाविरुद्ध दि. १४.१२.२०२२ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सरावली ग्रामपंचायत यांना दिनांक २० फेब्रुवारी,२०२२ रोजी महाराष्ट्र शासन नागरीकांची सनद २००० (सुधारीत) मध्ये पान क्रं. २८ येथे परिशिष्ट ४ मध्ये अनुक्रमांक ७ नुसार कारवाई करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्धवत नाही.
(४)प्रश्न उद्धवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषदेच्या खात येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामधील वैद्यकीय अधिकाऱ्यावर कारवाई करणेबाबत

**(४८) ७८४८५ (११-०३-२०२४). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हापरिषदेच्या खात येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये चहा न मिळाल्याने वैद्यकीय अधिकाऱ्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया अर्ध्यावर सोडली असल्याचा प्रकार दिनांक १२ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यासाठी शासनाने तीन सदस्यीय समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू समितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(४) असल्यास, सदरहू समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारसीचे थोडक्यात स्वरूप काय आहे आणि तदनुषंगाने सदर प्रकरणातील दोषी वैद्यकीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१९-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) उक्त प्रकरण चौकशीकरिता ५ अधिकाऱ्यांची चौकशी समिती गठित करण्यात आली आहे.
(३) सदर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना दि. १०.११.२०२३ ला चौकशी अहवाल सादर केला आहे.
(४) प्रा.आ.केंद्र खात तालुका मौदा जिल्हा नागपूर येथे दि. ०३/११/२०२३ ला कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिरा दरम्यान डॉ. तेजराम भलावी (सर्जन) हे स्वतः मधुमेहग्रस्त असल्याकारणाने त्यांना शस्त्रक्रियागृहात अस्वस्थ वाटत असल्यामुळे राहिलेल्या ४ कुटुंब कल्याण लाभार्थी यांना भुल न देता ते तात्पुरत्या स्वरुपात शस्त्रक्रियागृहा बाहेर पडले. काही

कालावधी गेल्यानंतर डॉ. तेजराम भलावी (सर्जन) यांना स्वतःचे प्रकृतीत सुधारणा जाणवल्यामुळे राहिलेल्या ४ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया लाभार्थी यांना भुल देऊन सर्व ८ शस्त्रक्रिया पूर्ण केल्या.

सदर चौकशी अहवालावरुन प्रा.आ.केंद्र खात येथील वैद्यकिय अधिकारी डॉ. आशीष बैनलवार व डॉ. तेजराम भलावी (सर्जन) या दोघांमध्ये नियोजीत कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिरादरम्यान समन्वय नसल्यामुळे सदर घटना घडल्याचे अभिप्राय चौकशी समितीने दिलेला आहे.

त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नागपूर यांनी प्रा.आ.केंद्र खात येथिल वैद्यकीय अधिकारी डॉ. आशीष बैनलवार यांचा कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याबाबतचा खुलासा मागविला आहे. तसेच डॉ. तेजराम भलावी (सर्जन) यांची आस्थापना जिल्हा शल्यचिकित्सक, नागपूर यांच्याकडे असल्यामुळे जिल्हा शल्यचिकित्यक, नागपूर यांना चौकशी अहवालाच्या अनुषंगाने उचीत कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
(५) लागू नाही.

---

## महाराष्ट्रातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागामधील गट अ ते ड मधील कर्मचारी एकस्तर योजना लागू करण्याबाबत

**(४९) ७९३१० (०८-०२-२०२४). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागामधील गट अ ते ड मधील कर्मचारी ज्यांना आश्वासीत योजनेचा लाभ दिला असून, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक ६ ऑगस्ट, २००२ मधील जाचक अटीमुळे त्यांना एकस्तर योजना लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शासन निर्णयाच्या विरोधात मा. उच्च न्यायलय येथे रिट याचिका क्रमांक ९६४३/२०२१ अन्वये याचिकाकर्ते यांचे बाजुने निकाल लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर याचिकेतील निकालाच्या अनुषंगाने ग्रामविकास विभाग यांनी त्यांच्या दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रानुसार सामान्य प्रशासन व वित्त विभाग यांचे अभिप्रायाचे अनुषंगाने जिल्हा परिषद नंदुरबार यांना योग्यती कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच पालघर जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या सर्व पदधारकांना सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ६ ऑगस्ट, २००२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय केलेला एकस्तर योजनेचा लाभ जिल्हा कोषागार अधिकारी पालघर यांचेकडील दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी परिपत्रकान्वये बंद करण्यात आली असून सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ५ फेब्रुवारी, १९९९ रोजीच्या शासन निर्णयातील अट क्र. २ व ६ दिनांक ६ ऑगस्ट, २००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार वगळून आदिवासी/नक्षलग्रस्त भागातील सर्व पदधारकांना एकस्तर ही अतिरिक्त सवलत अनुज्ञेय केली असतांना पालघर जिल्हा मुख्यालयातील कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना सदर लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय.
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी/नक्षलग्रस्त भागामधील गट अ ते ड मधील कर्मचारी एकस्तर योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही,
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांनी एकस्तर पदोन्नती बाबत केलेल्या कार्यवाही विरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सदरहू रिट याचिका दाखल करण्यात आली होती. सदर रिट याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या बाबतीत योग्य निर्णय घेण्याचे निर्देशित केलेले आहे.

(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागाकडून घोषित करण्यात आलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रात सेवारत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनाच एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ दिला जातो. पालघर जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या कोळेगाव या गावाचा आदिवासी क्षेत्रात समावेश नसल्याने या ठिकाणी कार्यरत असलेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना एकस्तर पदोन्नती योजनेची सवलत देय नाही. मात्र त्यांना प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे.

(५) आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेले काही कर्मचारी हे आश्वासित प्रगती योजनेच्या लाभास पात्र ठरल्यानंतर त्यांना देण्यात आलेला एकस्तर योजनेचा लाभ काढून घेण्यात आला. या कार्यवाही विरोधात त्यांनी मा. उच्च न्यायालयात विविध रिट याचिका दाखल केल्या होत्या.

सदर रिट याचिकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.०२.२०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, आदिवासी/नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेले कर्मचारी आश्वासित प्रगती योजनेच्या लाभास पात्र ठरल्यानंतर त्यांना त्यापूर्वी लागू केलेल्या एकस्तर योजनेच्या लाभाची वसूली करुन आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करणे अभिप्रेत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सिमेंट उद्योग व सिमेंटवर आधारित उद्योग यातील कामगारांना किमान वेतन लागू करणेबाबत

**(५०) ७९३२१ (०८-०२-२०२४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सिमेंट उद्योग व सिमेंटवर आधारित उद्योग यातील कामगारांना समान किमान वेतन लागू करण्यात आले असूनही सिमेंट उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना सध्या अल्प वेतन मिळत असल्याने किमान वेतन यादीमध्ये दुरुस्ती करुन सिमेंट उद्योगातील कामगारांना किमान वेतन देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींकडून तसेच विजयक्रांती संघटनेद्वारे मागील काही वर्षापासून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मंत्री, कामगार यांच्यासमवेत माहे जुलै व नोव्हेंबर २०२१ मध्ये झालेल्या बैठकीत कोणत्याही परिस्थितीत योग्य किमान वेतन मिळणे आवश्यक असून सिमेंट उद्योगातील श्रमिकांकरीता किमान वेतन समितीमध्ये वेतनवाढीबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन किमान वेतन देणेबाबत निर्णय झाला, हे ही खरे आहे काय,

(३) तथापि तत्कालीन प्रधान सचिव-कामगार विभाग, श्री. सुरेश जाधव-तत्कालीन कामगार आयुक्त यांना सिमेंट उद्योग व सिमेंटवर आधारित उद्योग यातील कामगारांना किमान समान वेतन लागू करण्येबाबतचा प्रस्ताव करुन तातडीने कार्यवाही करण्याबाबत तत्कालीन मंत्री, कामगार यांनी निर्देश देऊनही माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये झालेल्या बैठकीतील प्रस्तावास दोन वर्षांचा विलंब करुन माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तिन्ही प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कामगारांच्या मागण्यांबाबतचा प्रस्ताव जाणीवपूर्वक विलंबाने सादर करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सिमेंट उद्योग व सिमेंटवर आधारित उद्योग यातील कामगारांना किमान समान वेतन लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. २५६ (35)

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०७-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) किमान वेतन अधिनियमातील कलम ९ अंतर्गत समिती/उपसमिती गठित करण्याच्या तरतूदीस अनुसरुन सिमेंट व सिमेंटवर आधारित उद्योगाकरिता स्वतंत्रपणे किमान वेतन दर निश्चितीबाबत अभ्यास करुन शिफारस करण्यासाठी समिती गठित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.